# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-१९०　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक- १७/०५/२०२४.

## घरफोडी करून रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने चोरी करण्या-या आरोपीस भाईंदर पोलीस ठाणे कडून अटक

भाईंदर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा रजि क्र. १०४/२०२४ भा.द.वि.स. कलम ४५४,३८० प्रमाणे गुन्हा नोंद असुन गुन्हयाची हकीगत अशी की, सदर गुन्हयातील फिर्यादी दि. २८/०२/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. ते २०.०० वाजण्याचे सुमारास फिर्यादी यांचे राहते घराचे कुलुप कोणत्यातरी साधणाने तोडून आत प्रवेश करुन फिर्यादीचे घरातील रोख रक्कम व सोने चांदीचे दागिणे असे ३,८९,००० रुपये किंमतीचे सोने व रोख रक्कम अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेले म्हणून गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हा हा दिवसा घरफोडीचा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु करण्यात आला होता. तपासा दरम्यान गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देवुन गुन्हयाच्या घटनास्थळाचे, तसेच घटनास्थळाकडे येणा-या-जाणा-या रस्त्याचे उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासले तसेच गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळवून सदरचा गुन्हा हा फिर्यादी यांची सुन शालु अमरजित बोथ व तिचे मामाचा मुलगा रजत श्यामलाल बिडलान यांनी संगणमताने चारी केल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास केला असता फिर्यादी यांची सुन शालु अमरजित बोथ हिचेकडे सखोल चौकशी करून १,९१,५००/- रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल आरोपीतांकडून हस्तगत करण्यात भाईंदर पोलीस ठाणेस यश प्राप्त झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, दिपाली खन्ना, सहायक पोलीस आयुक्त, भाईंदर विभाग, सुर्यकांत नाईकवाडी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर पोलीस ठाणे, विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री माणिकराव कतुरे, पोउनि/प्रसाद गोवले, पोहवा-रविंद्र भालेराव, राजेश श्रीवास्तव, किरण पी. पवार, किरण आर. पवार, सुशिल पवार, पोना/रामनाथ शिंदे, पोशि-संजय चव्हाण, सलमान पटवे यांनी केलेली आहे.

-------------ooooo------------